CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## आता मुख्यमंत्री डॉ.एकनाथ शिंदे म्हणायचं...

### नवी मुंबईतील कार्यक्रमात डी.लीट पदवी प्रदान



**नवी मुंबई** : डी.वाय.पाटील विद्यापीठाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डी.लीट पदवी देऊन सन्मानित करण्यात आले आहे. मंगळवारी डी. वाय पाटील स्टेडियममध्ये पार पडलेल्या दीक्षांत समारोहात त्यांना डी.लीट ही पदवी समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत सामाजिक, वैद्यकीय आणि आपत्कालीन व्यवस्थापन क्षेत्रात केलेल्या कामाबद्दल त्यांना ही मानद डी. लीट पदवी प्रदान करण्यात येत असल्याचे डीवाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. विजय पाटील यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. सामाजिक क्षेत्रात खास करून कोरोना काळात रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळावी, त्याना रेमडेसीवीर आणि इतर औषधे मिळावीत यासाठी शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले. लोकांमध्ये मिसळून त्यांनी अनेकांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २९ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १७९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# कशासाठी? ठाकरे सरकार पाडण्यासाठी, फडणवीसांसोबत दोन वर्षात दीडशे बैठका


## • आरोग्यमंत्री तानाजी सावंतांनी उघड केली व्युव्हरचना

सुराज्य/परंडा

**जेव्हा मंत्रिपद मिळाले नाही; तेव्हाच प्रतिज्ञा केली... पुन्हा 'मातोश्री'ची पायरी चढणार नाही... सरकार पाडल्याशिवाय गप्पही बसणार नाही... कामाला लागलो... देवेंद्र फडणवीस मदतीला होतेच... त्यांच्या सहकार्याने पहिली बंडखोरी मीच केली... राज्यात महाविकास आघाडी असतानाही धाराशिव जिल्हा परिषदेत भाजपसोबत सत्ता स्थापन केली... त्यानंतर महाराष्ट्र पिंजून काढला... फडणवीसांसोबत दोन वर्षात तब्बल दीडशे बैठका घेतल्या... कशासाठी?... तर ठाकरे सरकार पाडण्यासाठी... ही होती ठाकरे सरकार पाडण्याची व्युव्हरचना. ती आता पहिल्यांदाच शिंदे-फडणवीस सरकारमधील आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी उघड केली आहे. त्यामुळे ठाकरे सरकारच्या पतनात भाजपचाच हात होता; हे आता उघड झाले आहे.**

परंडा येथे आयोजित भैरवनाथ केसरी कुस्ती स्पर्धे दरम्यान आयोजित कार्यक्रमात आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी हा राजकीय गौप्यस्फोट करून सत्तांतर नाट्यामागच्या सस्पेन्स उघड केला आहे. ठाकरे सरकार सत्तेत येण्यापूर्वी राज्यात भाजप-सेना युतीचे सरकार होते. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मंत्रिमंडळात तानाजी सावंत हे कॅबिनेट मंत्री होते. जेव्हा सन २०१९ मध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या, तेव्हा भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला.निवडणुकीत भाजप-सेनेची युती होती. मात्र निवडणूक निकालानंतर ही युती तुटली आणि दोन्ही काँग्रेसच्या सहकार्याने राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. उध्दव ठाकरे हे या सरकारमध्ये मुख्यमंत्री होते.

मंत्री सावंत यांनी हे खळबळजनक वक्तव्य केले तेव्हा त्याठिकाणी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, आरपीआयचे सरचिटणीस संजय कुमार बनसोडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, जिल्हा प्रमुख दत्ता साळुंके, माजी नगर अध्यक्ष जाकिर सौदागर, अनिल खोचरे, गौतम लटके, रत्नकांत शिंदे, सुरेश डाकवाले आदी उपस्थित होते.



### 'मातोश्री' ची पायरी न चढण्याची केली प्रतिज्ञा

उद्धव ठाकरे यांनी २०१९ च्या निवडणुकीत जनतेने दिलेला कौल नाकारला. भाजप-शिवसेना युतीला कौल दिलेला असताना शरद पवार यांनी त्यात मिठाचा खडा टाकला. जनमत डावलून पक्षप्रमुख ठाकरे यांनी महाविकास आघाडीसोबत सत्ता स्थापन केली. त्या सरकारमध्येही आपल्याला स्थान दिले नाही. त्यामुळे 'मातोश्री'वर जाऊन 'त्यांना' सांगून आलो की मी आता पुन्हा या 'मातोश्री'ची पायरी चढणार नाही, अशी प्रतिज्ञा केली होती, असे सावंत यांनी यावेळी स्पष्ट केले.

### पहिली बंडखोरी मीच केली

दि. ३० डिसेंबरला मंत्रिमंडळ विस्तार झाला. त्यात उद्धव ठाकरे यांनी मला संधी दिली नाही. चांगले काम करूनही डावलले. त्यामुळे संतप्त होऊन आपण देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने ३ जानेवारीला राज्यात पहिली बंडखोरी केली. भाजपच्या साथीने धाराशिव जिल्हा परिषदेत शिवसेना-भाजप युतीची अधिकृत सत्ता स्थापन केली. त्यासाठी मी आणि सुजितसिंह ठाकूर देवेंद्र फडणवीसांकडे गेला होतो. ही महाराष्ट्रातील माझी पहिली बंडखोरी होती, असेही सावंत यांनी यावेळी सांगितले.

### सरकार पाडण्याचे काम चालले दोन वर्षे

पहिली बंडखोरी यशस्वी झाल्यानंतर सावंत ठाकरे सरकार पाडण्यासाठी कामाला लागले. सलग दोन वर्षे त्यांनी आमदारांच्या गाठीभेटी सुरू केल्या. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांच्या भेटी घेतल्या. त्यांना समजावून सांगत त्यांचे मतपरिवर्तन केले. याकाळात देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांच्यासोबत सतत बैठका झाल्या. जवळपास १०० ते १५० बैठका झाल्या. त्यानंतर सुरत, गुवाहाटी मार्गे ते सरकार पाडले, असा गौप्यस्फोट तानाजी सावंत यांनी यावेळी केला.

### फडणवीसांनाही पाडले खोटे

ठाकरे सरकार पाडण्यात भाजपचा काहीही संबंध नाही, हे देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी वारंवार सांगितले आहे. मात्र तानाजी सावंत यांच्या गौप्यस्फोटाने फडणवीस यांनाही खोटे पाडले आहे. ठाकरे सरकार पाडण्याचे कटकारस्थान दोन वर्षांपासून शिजत असल्याचे पहिल्यांदाच समोर आले आहे. इतकेच नव्हे तर फडणवीस यांच्या आदेशानेच हे घडत होते, असे सांगत मंत्री सावंत यांनी खळबळ उडवून दिली आहे.

## होटगी रोडवरील बीएसएनएलचे सब डिव्हिजन कार्यालय सील

### पालिकेकडून एकाच दिवशी सव्वा कोटींची वसुली

सुराज्य/सोलापूर



महापालिका मिळकत कर वसुली पथकाकडून मंगळवारी होटगी रोडवरील बीएसएनएलचे सब डिव्हिजन कार्यालय मिळकत कर थकबाकीपोटी सील करण्यात आले तसेच येथील पाण्याचे २ नळही बंद करण्यात आले आहेत. दरम्यान पालिकेच्या पथकाने दिवसभरात एकूण १ कोटी २६ लाख रुपये कर वसुली करण्यात आली आहे.

होटगी रोडवरील बीएसएनएलचे सहाय्यक अभियंता टेलिको सब डिव्हिजन कार्यालयाकडे ७५ लाख ६७ हजार ५५३ रुपयांची थकबाकी होती. मंगळवारी हे कार्यालय सील करण्यात आले तसेच येथील दोन व एक इंची पाण्याचे नळही बंद करण्यात आले. ५८ पेठ येथील इमाम रमजान नदाफ यांच्याकडील ६ लाख ४ हजार ४७ ० रुपये थकबाकी पोटी पाच गाळे सील करण्यात आले आहेत.


दरम्यान, मालमत्ता कर विभाग मुख्य कार्यालय पथकाकडून सोलापूर शहरातील ६१ पेठ, सिव्हिल लाईन, ५८ पेठ येथील सात मिळकतदारांकडे एकूण ५ लाख ९५ हजार ११९ रुपये असलेल्या थकबाकी पैकी ५ लाख ३९ हजार ५५९ रुपये कर वसूल करण्यात आला आहे. कर त्वरित भरून महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मालमत्ता कर विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी केले आहे.

## राज्यात कोरोनाने तिघांचा मृत्यू; आढळले ४५० रुग्ण

सुराज्य/मुंबई

मागच्या २४ तासांमध्ये महाराष्ट्रात तीन कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. दिवसेंदिवस राज्यात कोरोनाचे रुग्ण वाढत असल्याने चिंता व्यक्त होतेय. मुंबईमध्ये कोरोना रुग्ण गतीने वाढत आहेत.

सध्या राज्यामध्ये २ हजार ३४३ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आहेत. डिसेंबर २०२२ पासूनच मुंबई, पुणे आणि नागपूर विमानतळावर परदेशातून आलेल्या प्रवाशांचे स्क्रीनिंग सुरू आहे. मागच्या २४ तासांमध्ये राज्यामध्ये ४५० नवीन कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. तर तीन रुग्णांच्या मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने ही माहिती दिली. मुंबईमध्ये कोरोना संक्रमणाच्या आकड्यांत



झपाट्याने वाढ होतेय. त्यामुळेच मुंबईतल्या अनेक दवाखान्यांमध्ये कोरोना वॉर्ड पुन्हा सुरू करण्यात आलेले आहेत. कोरोना वॉर्डमध्ये व्हेंटिलेटर सपोर्टसह इतर सुविधा सज्ज करण्यात आलेल्या आहेत. राज्यामध्ये ॲक्टिव्ह रुग्णसंख्या दोन हजारांपेक्षा जास्त असून आकड्यांनुसार ऑक्टोबरनंतर पहिल्यांदा सक्रिय रुग्णसंख्या दोन हजारांपेक्षा जास्त झाली आहे.

## हेडफोनने केला तरुणांचा घात; रेल्वे अपघातात मृत्यू

सुराज्य/मुंबई

कानात हेडफोन घालून रूळ ओलांडणाऱ्या तरुणास रेल्वेचा धक्का बसल्यामुळे जागीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. या अपघातात जुना कासेगाव रस्ता येथील जयेश जाधव (वय ३२) याचा मृत्यू झाला.

मंगळवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास पंढरपूर मिरज ही डेमो रेल्वे येथील रेल्वे स्थानकातून निघाली असता उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयासमोरील रुळावरून जयेश जाधव हा कानामध्ये हेडफोन घालून रुळावरून जात होता. आपल्याच नादात असणाऱ्या जयेशचे रेल्वेच्या आवाजाकडे लक्ष गेले नाही. यामुळे इंजिनची जोरदार धडक बसल्यामुळे तो जागीच ठार झाला. या अपघातामध्ये जयेशचा पाय गुडघ्यापासून तुटून रुळाच्या बाजूला पडला होता. तसेच त्याच्या डोक्याला जोरदार मार लागला होता. घटनेनंतर तातडीने रेल्वे पोलिसांनी धाव घेतली.

## मुश्रीफांना न्यायालयाचा दिलासा; अटकपूर्व जामीनावरील निकाल ५ एप्रिलला



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अटकपूर्व जामीन याचिकेवरील सुनावणी आज न्यायालयात पार पडली. या याचिकेवर झालेल्या सुनावणीचा निकाल न्यायालयाने राखून ठेवला आहे. या याचिकेवरील निकाल येत्या ५ एप्रिलला न्यायालय देणार आहे.

पुढील सुनावणीपर्यंत हसन मुश्रीफ यांना अटक होणार नाही. त्यामुळे विशेष पीएमएलए न्यायालय हसन मुश्रीफ यांच्याबाबत काय निकाल देते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. हसन मुश्रीफ हे सध्या ईडी कारवाईच्या ससेमिऱ्यात अडकले आहेत. त्यांच्या कोल्हापुरातील कागल येथील घरी ईडी अधिकाऱ्यांनी दोन वेळा छापेमारी केली. या छापेमारीतून ईडी अधिकारी त्यांच्या घरातून काही महत्त्वाची कागदपत्रे घेऊन गेल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे ईडी अधिकाऱ्यांनी मुश्रीफ यांना चौकशीसाठी समन्स बजावले होते. पण मुश्रीफांनी सुरवातीला चौकशीला जाणे टाळले होते. त्याऐवजी त्यांनी न्यायालयात अटकेपासून संरक्षण मिळावे यासाठी पावले उचलली.

## कमलापूर गावाजवळ अपघात; इसम ठार

सुराज्य/सांगोला



मिरज-सांगोला या राष्ट्रीय महामार्गावरील कमलापूर गावाजवळ पिकअप वाहनाने दुचाकी वाहनास पाठीमागून धडक दिल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंत्रोळी येथील भीमराव लक्ष्मण करपे हा मयत झाला असून शंकर मच्छिंद्र चौगुले हा गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी सकाळी दहाच्या सुमारास घडली

दक्षिण तालुक्यातील अंत्रोळी येथील भीमराव लक्ष्मण करपे हा मंगळवेढा येथील नातेवाईक शंकर मच्छिंद्र चौगुले यांच्या मालकिच्या मोटरसायकल वरून आरेवाडी येथील बिरोबा यात्रेला गेला होता. तेथून मंगळवारी सकाळी परत आपल्या गावी येत असता मिरज-सांगोला या राष्ट्रीय महामार्गावरील कमलापूर या ठिकाणी सकाळी दहाच्या सुमारास अज्ञात पिक अप वाहनाने त्याच्या गाडीला पाठीमागून धडक दिली. यात भीमराव करपे हा जागीच मयत झाला आहे तर शंकर चौगुले हा गंभीर जखमी झाला. याबाबत दादासाहेब लक्ष्मण करपे यांनी सांगोला पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



परीक्षा त्याची संपली आहे, तुमची नव्हे !

| कल्याण |
|---|
| 567-87-359 |

| मेन बाजार |
|---|
| ----- |

## स्मार्ट सिटी संचालक मंडळ बैठक

# दुहेरी जलवाहिनीसंदर्भात स्मार्ट सिटी-पोचमपाड यांच्यात तडजोडीस मान्यता

सुराज्य/सोलापूर

**सर्वांचे लक्ष लागलेल्या स्मार्ट सिटी प्राधिकरण संचालक मंडळाच्या बैठकीत मंगळवारी उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामासंदर्भात पोचमपाड कंपनी व स्मार्ट सिटी यांच्यात तडजोड करण्याच्या विषयास मान्यता देण्यात आली. असे असले तरी सदस्य समितीकडून नियम अटी शर्ती आराखडा तयार करून लवादाकडे सादर केल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. साधारणता येत्या १५ दिवसात यावर कार्यवाही होईल, अशी माहिती सोलापूर स्मार्ट सिटीच्या सीईओ शितल तेली-उगले यांनी दिली.**



### ... तर लक्ष्मी कंपनीचा करार रद्द होणार

लवादात पोचमपाड संदर्भात निर्णय झाला तर लक्ष्मी कंपनी सोबत झालेला करार रद्द करण्यास हरकत नाही. झालेला खर्च व डिपॉझिट परत द्यावी असा प्रस्तावही लक्ष्मी कंपनीने सादर केला आहे, असेही सीईओ शितल तेली-उगले यांनी स्पष्ट केले. या जलवाहिनीच्या कामाला गती मिळावी या दृष्टिकोनातून चर्चा करण्यात आली, असेही त्यांनी सांगितले.

### तातडीने निर्णय घ्यावा अन्यथा आंदोलन : प्रा. सावंत

दोन मक्तेदारांच्या वादामुळे सोलापूरचा पाणी प्रश्न तसाच प्रलंबित राहिला आहे.जनतेला वेठीस धराल तर शिवसेना गप्प बसणार नाही. यावर आवाज उठवू. दोन मक्तेदारांच्या स्वार्थासाठी जलवाहिनीचे काम थांबवू नका. राज्य शासनाने यावर तातडीने तोडगा काढून दुहेरी जलवानीचे काम त्वरित सुरू करावे अन्यथा सोलापूरकर रस्त्यावर उतरतील असा इशारा शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांनी दिला आहे.

सोलापूर स्मार्ट सिटी प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे प्राधिकरणाचे चेअरमन असीम गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी चेअरमन असीम गुप्ता व जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थिती दर्शवली. स्मार्ट सिटीच्या सीईओ शीतल तेली - उगले, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी, महापालिकेचे नगर अभियंता लक्ष्मण चलवादी यांच्यासह सल्लागार सदस्य उपस्थित होते. प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेनंतर कोल्हापूरच्या लक्ष्मी कंपनीला देण्यात आलेल्या कामाबाबत यापूर्वीचे हैदराबाद येथील पोचमपाड कंपनी मक्तेदाराने लवादाकडे धाव घेतली. दिलेल्या नव्या प्रस्तावावर प्राधिकरणाकडून फेरविचार आणि काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने जोरदार हालचाली सुरू आहेत.

CMYK